वाचले:- १) महा.जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे नियम ६(८)

२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचेकडील प्रस्ताव क्रमांक जाक्र.आरोग्य/आस्था-३/५४७/२०१५ दि. ३०/०७/२०१५.

३) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपब/७०६/प्र.क्र.५०/अस्था१४/दि. २० मार्च २००७

४) शासन शुध्दीपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग जिपब/७०६/प्र.क्र.५०/अस्था१४,दिनांक १ जुन०७

५) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपब/७११/प्र.क्र.११३/११ अस्था१४ दि.२९/९/२०११

६) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची मंजुर टिपणी दिनांक- ५ /१० /२०१७.

## आदेश

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
आरोग्य विभाग
जा.क्र.जिपना/आरोग्य/अस्था५/१२२० /२०१७.
नाशिक दिनांक- ५ / १० /२०१७.

ज्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन **धुळे** जिल्हा परिषदेतील **श्रीम.सविता तानाजी भामरे, आरोग्य सेविका (महिला) प्राथमिक आरोग्य केंद्र.सुकापूर, उपकेंद्र.हारपाडा,ता.साक्री,जि.धुळे** यांना **पती पत्नी एकत्रिकरण अंतर्गत** एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने **नाशिक** जिल्हा परिषदेत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ परिशिष्ट ५ (९) मधील तरतुदीनुसार जिल्हा सेवा वर्ग-३ आरोग्य सेविका (महिला) तृतीय श्रेणी (५२००-२०२००) ग्रेड पे २४००/- या वेतनश्रेणीत खालीलप्रमाणे नमुद केलेल्या ठिकाणी पदस्थापना खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन नाशिक जिल्हा परिषदेमध्ये सामावुन घेण्यांचा आदेश देत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | नाशिक जिल्हा परिषदेमध्ये ज्या प्रवर्गात सामावुन घेण्यात आलेला प्रवर्ग | अनुसूचित क्षेत्रात पदस्थापना दिलेले कार्यालय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रा.आ.केंद्र | उपकेंद्र | तालुका |
| १) | श्रीम.सविता तानाजी भामरे, | आरोग्य सेविका (महिला) | इ.मा.व | खुला | सौंदाणे | टाकळी | मालेगाव |

**अटी व शर्ती.**

१) श्रीम.भामरे, आरोग्य सेविका (महिला) यांना अनुज्ञेय असलेल्या वेतन श्रेणीत समकक्ष पदावर समान वेतनश्रेणीत आरोग्य सेवक (गट क) या पदावर सध्या घेत असलेल्या मुळ वेतनावर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत सामावुन घेण्यात येत आहे.

२) श्रीम.भामरे,आरोग्य सेविका (महिला) यांना नशिक जिल्हा परिषद अंतर्गत त्यांना पदस्थापना दिलेल्या कार्यालयात ज्या तारखेस रुजु होतील त्या दिनांकापासुनची त्यांची आरोग्य सेवक (गट क ) या सवर्गात सेवाजेष्ठता धरणेत येईल.

३) श्रीम.भामरे, आरोग्य सेविका (महिला) यांची नियुक्ती पूर्णत: हंगामी स्वरुपाची राहील. कोणतेही कारण नमुद न करता ते जिल्हा परिषद सेवेतुन मुक्त करण्यांस पात्र राहील.

४) श्रीम.भामरे,आरोग्य सेविका (महिला) यांची धुळे जिल्हा परिषदेकडील कोणत्याही प्रकारच्या थकबाकीच्या वसुलीस नाशिक जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

५) श्रीम.भामरे,आरोग्य सेविका (महिला) हया जिल्हा परिषद, धुळे कडुन कार्यमुक्त झालेनंतर त्यांना नाशिक जिल्हा परिषदमध्ये हजर होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा वाटचाल कालावधी अथवा बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६) श्रीम.भामरे, आरोग्य सेविका (महिला) हे नाशिक जिल्हा परिषदे अंतर्गत हजर झालेवर त्यांना सदर जिल्हा परिषदेचे सर्व नियम व अटी लागु राहतील .

७) नेमणुकीनंतर विहित असलेली किंवा केल्या जाणाऱ्या शासकीय परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण होणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

८) सेवा शर्ती नियमानुसार श्रीम.भामरे,आरोग्य सेविका (महिला) यांचे सेवा कालावधीत त्यांना केवळ एकदाच आंतर जिल्हा बदलीचा लाभ अनुज्ञेय आहे.

९) श्रीम.भामरे,आरोग्य सेविका (महिला) हया सदरचा आदेश मिळालेपासुन एक महिन्याच्या आत त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

सदर आदेशाची नोंद संबंधीताचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात येवुन योग्य ती कार्यवाही तात्काळ करणेत यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

रजिष्टर पोष्टाने पोहोच पावतीसह

प्रति, १) म.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद.धुळे यांना उचित कार्यवाहीसाठी.

२) म.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,धुळे.

३) श्रीम.सविता तानाजी भामरे,आरोग्य सेविका (महिला) प्राथमिक आरोग्य केंद्र.सुकापूर, उपकेंद्र.हारपाडा,ता.साक्री,जि.धुळे व्दारा, म.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, धुळे यांचे मार्फत

प्रत:- १) म.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,धुळे / नाशिक.

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री, जि.धुळे / ----------- जि.नाशिक

३) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, --------- ता. ----------- जि. नाशिक.

४) ज्ञापन नस्ती

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**